# बृहन्मुंबई महानगरपालिका

## पुस्तीका क्र. ०८

मंडळे, परिषदा, समित्या आणि त्याचाच एक भाग म्हणून किंवा त्यांच्या सल्ल्याकरिता, दोन किंवा अधिक त्यथ्कतंचा समावेश असलेल्या घटित केलेल्या संस्थांचे विवरण आणि अशी मंडळे, परिषदा, समित्या आणि संस्थांच्या सभा जनतेकरिता खुल्या असतात का किंवा अशा सभांचे सभा वृतांत जनतेला (सहज) उपलब्ध असतात का या विषयी

# समित्यांची यादी

| अ.क्र. | समितीचे नाव | सचिव |
|---|---|---|
| १. | एच.आय.व्ही./एड्स केंद्रीय समिती, बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | डॉ. सुर्यवंशी |
| २. | ग्रथालय समिती | श्री. अरविंद दंडाळे |
| ३. | रिसर्च सोसायटी, बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय व टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय | डॉ. चित्रा नायक |
| ४. | पथ्याहार उप समिती | डॉ. पंकजा आगल |
| ५. | पदविपूर्व शैक्षणिक समिती- व्दितीय वर्ष एम.बी.बी.एस. | डॉ. जी. व्ही. पुराणिक |
| ६. | संसर्ग नियंत्रण समिती | डॉ. जे.एस. शास्त्री |
| ७. | प्रयोगशाळा समिती | डॉ. जी.व्ही. पुराणिक |
| ८. | रूग्णालय रक्तसंक्रमण समिती | डॉ. जी.व्ही. पुराणिक |
| ९. | विद्यार्थी जिमखाना समिती | डॉ. प्रमोद संकपाळ |
| १०. | विद्यार्थी जिमखाना उपहारगृह समिती | डॉ. पंकजा आगल |
| ११. | पोस्टग्रॅज्युएट अकॅडमिक समिती (नितिमुल्यावलोकर समिती) पदव्युत्तर शैक्षणिक समिती | डॉ. रेणूका मुंन्शी |
| १२. | वसतीगृह सुधार समिती | डॉ. संदिप भेटे |
| १३. | पदवीपूर्व शैक्षणिक समिती - तृतीय वर्ष वैद्यक | डॉ. मिनू संजना |
| १४. | वैद्यकीय शिक्षण आणि शैक्षणिक तंत्रविज्ञान कक्ष | डॉ. वृंदा कुलकर्णी |
| १५. | भंगार माल विल्हेवाट समिती | सहा. अभियंता (यां व वि) |
| १६. | जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) | डॉ. पंकजा आगल |
| १७. | गरीब रूग्ण निधी | डॉ. पंकजा आगल |
| १८. | कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैगिंक छळाच्या प्रतिबंधाची तक्रार समिती | डॉ. ए.एम. कान्हेरे |
| १९. | डिपार्टमेंन्ट डेव्हलपमेंट फंड | डॉ. प्रेमलता वर्थकवी |

# ग्रंथालय समिती

१) नाव व संबंधित समितीचा पत्ता
ग्रंथालय समिती
टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा.य.ल.नायर धर्मा.रुग्णालय
डॉ.ए.ल.नायर रोड,मुंबई - ४०००८.

२) संबंधित समितीचा प्रकार - समिती

३) संबंधित समितीचा थोडक्यात परिचय - स्थापनावर्ष - १९७८

**उददेश**

ग्रंथालय समिती ही प्रमुख वैद्यकीय ग्रंथपाल हयांना सर्व विषयातील धोरण अनुसरायला सल्ला देते. ग्रंथालयासाठी लागणा-या पैशाचा आढावा घेऊन त्याप्रमाणे आवश्यक पैशाची शिफारस करते वा सल्ला देते. ही समिती वाचक व ग्रंथालयीन कर्मचारी हयामध्ये दुवा म्हणून काम करते, की ज्यामुळे वाचक व ग्रंथालयीन धोरणामध्ये चांगल्या प्रकारचे संबंध राहतात.

**मुख्य उददेश**

खात्रीपूर्वक ग्रंथालयाचा सर्वांगीण विकास करणे ग्रंथालयात विषयाला धरुन अद्यावत वाचण्यासाठी नवीन साहित्याची भर घालून तसेच बरोबरीने अद्यावत माहिती तंत्र विकसीत करुन वाचण्यासाठी मैत्रीदायक वातावरण ठेवणे.

४) संबंधित समितीची भूमिका
पूर्णपणे सल्लागार

५) संबंधित समितीचा मुख्य
अधिष्ठाता (अध्यक्ष) आणि प्रमुख वैद्यकीय ग्रंथपाल (सचिव)

६) मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा
वरीलप्रमाणे.शाखा नाहीत.

७) सभेचा नियमितपणा
वर्षातून कमीत कमी दोन वेळा आणि जेव्हा एखादा मुददा तातडीचा व गरजेचा असल्यास विचार करण्यासाठी सभा घेण्यात येते.

८) सभेमध्ये लोक सहभागी हो शकतात का?
नाही.

९)  सभेचा तपशिल बनवितात का?
    होय

**सही/-**
श्री अरविंद जे. दंडाळे.

# पथ्याहार उप समिती

**पथ्याहारासबंधी निविदेच्या पध्दती**

विविध प्रकारच्या निविदा समित्यांची माहिती व त्यांची कामे या सबधीची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अनु क्र. | समितीचे नाव | ठिकाण | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1. | औषध निविदा समिती | मध्यवर्ती खरेदी खाते | औषधे व सलग्न असलेल्या बाबींच्या खरेदीसाठी निविदा. |
| 2. | कपडा व उपस्कर उप.समिती | मध्यवर्ती खरेदी खाते | कपडे व उपस्कर या बाबी खरेदी करण्यासाठी निविदा. |
| 3. | पथ्याहार उप. समिती | बा.य.ल.नायर धर्मा. रुग्णालय. | विविधा प्रकारच्या खाद्य बाबी खरेदी करण्यासाठी निविदा. |

पूर्वीची पथ्याहार उप. समिती जी लोकमान्य टिळक रुग्णालय सायन येथे होती ती डिसेंबर 2000 मध्ये नायर रुग्णालयात हलविण्यात आली. अधिष्ठाता(नायर) हे समितीचे अध्यक्ष व उप. अधिष्ठाता (एक) हे समितीचे चिटणीस आहेत.

खालील दर्शविलेल्या निविदा पथ्याहार उप. समितीतर्फे दर वर्षी 180 दिवसांच्या विधिग्राह्यतेत हाताळल्या जातात.

| अनु क्र. | अनुसूची | तपशिल | करार कालावधी | एकूण बाबी |
|---|---|---|---|---|
| 1 | अनुसूची क्र. 1 | फळे व भाजीपाला | 13.11.2016 ते 12.11.2017 | 40 |
| 2 | अनुसूची क्र. 2 | कडधान्ये | 21.02.2016 ते 20.02.2017 | 30 |
| 3 | अनुसूची क्र. 3 | साखर,गव्हाचे पीठ व तांदूळ | 01.03.2016 ते 28.02.2017 | 3 |
| 4 | अनुसूची क्र. 4 | पाव,अंडी व चहा पावडर | 06.11.2016 ते 05.11.2017 | 3 |

वरिल नमूद केलेल्या अनुसूचींबाबत सविस्तरपणे निविदा मागविण्याची पध्दत खालील प्रमाणे आहे.

१. बाबींची मागणीपत्रके सर्व रुग्णालये व प्रसुतिगृहे यांना त्यांची वार्षिक मागणी पुरवविण्यासाठी पाठविण्यात येतात.

२. सर्व विभागांची मागणी आल्यानंतर परिमाण निश्चित करण्यासाठी सभा घेऊन परिमाण निश्चित

करण्यात येते.

३. मा.अधिष्ठाता यांच्या मंजुरी अन्वये प्रमुख 5 वृत्तपत्रामध्ये व मनपा पोर्टला निविदेची जाहिरात देण्यात येते.

४. नियत दिनांक रोजी लिफाफा "अ" व "ब" उघडून तांत्रिक छाननी तक्ता बनविण्यात येतो.

५. तांत्रिक छाननी करण्याकरिता समितीच्या सर्व सभासदांना बोलवून प्राप्त निविदाकारांच्या देकारांची छाननी करण्यात येते व प्रतियोगी निविदाकारांचे दर लिफाफे लेखा अधिकारी यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतात.

६. ए.बी.सी.आणि डी (म्हणजेच दर,श्रेणी एकूण किंमत व अटी) तक्ता बनविला जातो.

७. व्यावसायिंक छाननीत प्रतियोगी प्रथम लघुत्तम निविदाकारांना बाबी बहाल करण्याची शिफारस करण्यात आल्यानंतर त्यासबंधी मसुदापत्र बनविण्यात येते.

८. मसुदापत्र उप.प्रमुख लेखापाल (आरोग्य) यांच्याकडे पडताळणी करिता पाठवून ते संचालक(वै.शि.व प्र.रु.)/अति.आयुक्त (प.उ.) यांच्या स्वाक्षरी व मंजुरीकरीता सादर करण्यात येते.

९. अति.मनपा आयुक्त (प.उ.) यांच्या स्वाक्षरीनंतर सदर मसुदापत्र मनपा चिटणीसांच्या कार्यालयात स्थायी समितीच्या कार्यक्रम पत्रिकेवर ठेवण्यासाठी पाठविण्यात येते.

१०. स्थायी समितीचा ठराव आणि मंजुरी यांची प्रत प्राप्त झाल्यानंतर निविदाकारांना मंजुरीची पत्रे पाठविण्यात येतात.

११. दर पत्रक तयार करुन सर्व वापर करणा-या रुग्णालयांना व प्रसुतिगृहांना पाठविण्यात येते.

१२. कराराचे दस्तऐवज शिफारस केलेल्या कंत्राटदारांना लेखी करार करण्यासाठी पाठविण्यात येतात.

सही/-
उप अधिष्ठात (प्र)

# गरीब रूग्ण निधी

| | | |
|---|---|---|
| १. | संलग्न समितीचे नाव  व पत्ता | गरीब रूग्ण निधी समिती बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय |
| २. | संलग्न समितीचा प्रकार (बोर्ड कौन्सिल कमिटी अदर बॉडीज) | समिती |
| ३. | संलग्न समितीची संक्षिप्त माहिती (आस्थापनिय वर्ष, कार्याचा मुख्य हेतू) | वर्ष १९९१ दि. ०६.०८.१९९८ रोजी अधिष्ठातांच्या झालेल्या सभेत ठरल्याप्रमाणे राजे एडवर्ड रूग्णालयातील समितीच्या धर्तीवर सदर रूग्णालयात सुध्दा तशाच समितीची स्थापना केली. गरीब आणि गरजू रूग्णांना औषधे, शस्त्रक्रियेसाठी लागणारी उपकरणे, गाडीभाडे, कुबडया आणि आवश्यकतेनुसार लागणारी सर्व प्रकारची मदत समाज विकास अधिका-यांच्या शिफारशीने दिली जाते. तसेच रूग्णांवर करण्यता येणा-या प्रगत व मोठया शस्त्रक्रिया उदा. हृदयशस्त्रक्रिया, मेंदुवरील शस्त्रक्रिया इ. लागणारे साहित्य, उपकरणे, हृदयाच्या झडपा तसेच महागडया चांचण्या हयांचे शुल्क सदर निधीतून दिले जाते. |
| ४. | संलग्न समितीची भूमिका (सल्लागार) | १. गरीब आणि गरजू रूग्ण ज्यावेळी औषधोपचारासाठी सदर रूग्णालयात येतात अशा रूग्णांसाठी समाज विकास अधिकारी त्यांच्यावरील महागडे उपचार, महागडया चाचण्यांसाठी, मोठया शस्त्रक्रियेसाठी देणगी रक्कम विविध विश्वस्थ संस्थाकडून जमा करून गरीब रूग्ण निधी विभागात जमा करतात. सन २००३-०४ सालात एकूण रू. २,५०,००,०००/- फक्त (रूपये दोन करोड पन्नास लाख फक्त) गोळा झाले.<br>२. हृदयरोग विभाग, हृदयशस्त्रक्रिया विभाग, कृत्रीम मूत्रपिंड रोपण विभाग इ. संबंधीत रूग्णांसाठी साहित्य व उपकरणे खरेदी करतात त्यांच्या देयकांचे अधिदान हया निधीतून केले जाते.<br>३. तातडीने रूग्णावर कराव्या लागणा-या चाचण्या औषधे, उपकरणे इ. साठी लागणारा खर्च सहा. अधिष्ठाता/उप अधिष्ठाता/अधिष्ठाता हयांची मंजुरी घेऊन करण्यात येतो. सदर खर्च मुदत ठेवीवर मिळणारे व्याज/देणग्या/धर्मदाय पेटयातील जमा रक्कम/रूग्णांकडून मिळणा-या शुल्कातील सहभागाची रक्कम अन्वये भागविला जातो. अशी अंदाजे रक्कम रूपये ३,००,००,०००/- (रूपये तीन करोड )फक्त जमली. |
| ५. | हिशेब तपासणी रचना व सदस्य संघटना | १. अतिरिक्त महापालिका आयुक्त कायम स्वरूपी विश्वस्त<br>२. अधिष्ठाता (नायर) व्यवस्थापकीय विश्वस्त<br>३. उप अधिष्ठाता क्र. १ (नायर) विश्वस्त<br>४. उप अधिष्ठाता क्र. २ (नायर) विश्वस्त<br>५. सहा. अधिष्ठाता क्र. १ (नायर) विश्वस्त |

| | | |
|---|---|---|
| | | ६. सहा. अधिष्ठाता क्र. २ (नायर) विश्वस्त<br>७. प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (हृदयशल्य विशारद) विश्वस्त<br>८. प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (हृदयरोग चिकित्सा विभाग) विश्वस्त<br>९. प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (मुत्रपिंड विभाग) विश्वस्त<br>१०. प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (मेघशास्त्र विभाग) विश्वस्त<br>११. प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (मंज्जातंतू शस्त्रक्रिया) विश्वस्त<br>१२. प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (औषध शास्त्र) विश्वस्त<br>१३. उप प्रमुख लेखापाल (रूग्णालये) विश्वस्त<br>१४. प्रमुख वैद्यकीय समाज सेवा अधिकारी विश्वस्त<br>१५. मुख लिपिक (गरीब रूग्ण निधी) सभासद |
| ६. | सभा आयोजन | दर महिन्यास |
| ७. | सर्वसामान्य जनता सभेस उपस्थित राहू शकते का | नाही |
| ८. | सभेचा इतिवृत्तांत तयार केला जातो का | होय |

# बा.य.ल. नायर धर्मादाय रुग्णालयाच्या गरीब रुग्ण निधी समीतीची यादी

| अ.क्र. | गरीब रुग्ण निधी समीतीच्या विश्वस्ताची यादी | पद |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता (नायर ) | व्यवस्थापकीय विश्वंस्थ |
| २ | उप.अधिष्ठाता (नायर) | विश्वंस्थ |
| ३ | सहा. अधिठाता (नायर) | विश्वंस्थ |
| ४ | प्राध्यापक आणि विभागप्रमुख हृदय शल्यचिकीत्सा | विश्वंस्थ |
| ५ | प्राध्यापक आणि विभागप्रमुख हृदयशास्त्र | विश्वंस्थ |
| ६ | प्राध्यापक आणि विभागप्रमुख मुत्रपिंडोपचारशल्यचिकित्सा. | विश्वंस्थ |
| ७ | प्राध्यापक आणि विभागप्रमुख वैद्यकशास्त्र विभाग | विश्वंस्थ |
| ८ | प्राध्यापक आणि विभागप्रमुख मुत्रपिंडोपचार विभाग | विश्वंस्थ |
| ९ | प्राध्यापक आणि विभागप्रमुख सर्वसाधारण शल्यचिकित्सा | विश्वंस्थ |
| १० | प्राध्यापक आणि विभागप्रमुख अस्थिव्यंगपोचार. | विश्वंस्थ |
| ११ | सह.प्रमुख कर्मचारी अधिकारी | विश्वंस्थ |
| १२ | विभागप्रमुख वैद्यकिय समाज सेवा | विश्वंस्थ |
| १३ | प्रशासकीय अधिकारी (नायर) | विश्वंस्थ |
| १४ | मुख्य लिपीक (गरीब रुग्ण निधी) | विश्वंस्थ |

सही/-

उप अधिष्ठाता

# नायर गोल्डन ज्युबिली रिसर्च फाउंडेशन

प्रकार - धर्मादाय आयुक्तांचे नोंदणी केलेली संस्था

नोंदणी वर्ष - १९७१

**प्रमुख उद्‌दिष्टे**

अ. वैद्यक व शल्यक्रिया शास्त्राबाबत पध्दतशीर संशोधनाकरिता उपकरणे व प्रयोगशाळा यांची स्थापना व देखरेख करणे.

ब. दवाखान्यात किंवा वैद्यकशास्त्रातील कोणत्याही शाखेत संशोधन करण्याच्या प्रमुख उद्देशासाठी संस्थेची स्थापना किंवा देखरेख करणे.

क. वैद्यकशास्त्रातील संशोधनाकरिता फेलोशिप बहाल करणे व संशोधनाकरीता आर्थिक सहाय्य प्रदान करणे.

ड. वैद्यकीय संशोधनास उत्तेजन देण्यासाठी व संशोधनाच्या परिणामांच्या प्रसाराकरिता पुस्तके, प्रपत्रे, नियतकालिके प्रसिध्द करणे वा त्यांचे वाटप करणे.

इ. व्याख्यान सभागृहे, वाचनालये व संग्रहालये यांची स्थापना व देखरेख करणे आणि वैद्यकीय संशोधनास उत्तेजन देण्याकरिता व्याख्याने, परिसंवाद व परिषदा यांचे आयोजन करणे.

फ. विविध रोगांचा शोध प्रतिबंध व उपचारांच्या नुतन चाचण्या निदान समजून विविध रोगांच्या आकलनाकरिता, निदानासाठी नुतन चाचण्यांचा शोध लावण्याकरिता तसेच रोगांच्या प्रतिबंध व उपचारपध्दतीत सुधारणा करण्याकरिता संशोधन कार्यास उत्तेजन देणे.

ग. वैद्यकीय संशोधनात कार्यरत असलेल्या इतर संस्थांना उत्तेजन देणे, व्यवस्थापित करणे, त्यांच्याशी सहकार्य कारणे, त्यांना आर्थिक मदत व इतर प्रकारे सहाय्य देणे.

**वैधानिक लेखापरिक्षण** - संस्थेने नेमणूक केलेल्या सनदी लेखा परिक्षकाव्दारे करण्यात येते.

**रचना -**

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
| --- | --- | --- |
| ०१. | डॉ. रमेश ना. भारमल | व्यवस्थापकीय विश्वस्त |
| ०२. | डॉ. संदिप भा. बावडेकर | कार्यकारी विश्वस्त |
| ०३. | डॉ. एम.के. संजना | विश्वस्त |
| ०४. | डॉ. एस.आर. सुर्यवंशी | विश्वस्त |
| ०५. | डॉ. के.एन. नागले | विश्वस्त |
| ०६. | डॉ. अलका नेरूरकर | विश्वस्त |
| ०७. | डॉ. माधव साठे | विश्वस्त |

कार्यालयाचा पत्ता - महाविद्यालय इमारत, तळ मजला,
टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि
बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय.
डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल,
मुंबई - ४०० ००८.

संस्थेच्या बैठकीची लघुत्तम वारंवारता - तीन महिन्यातून एकदा.
बैठकीचे कार्यवृत्त तयार केले जाते - होय.

सही/-

डॉ. एस.बी. बावडेकर

# डिपार्टमेंट डेव्हलपमेंट फाउंडेशन

संस्थेचे स्वरूप - समिती

समिती स्थापना वर्ष - २००५

**समितीचे प्रमुख उद्दिष्टे -**

शास्त्रीय संशोधनाची वाढ आणि महाविद्याल/रूग्णालयातील विविध विभागांची प्रगती आणि कार्यक्षम वाटचालीकरीता मदत करण्यासाठी हा निधी उभारण्यात आला आहे. हया उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी निधी टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयाच्या वेगवेगळया कार्यक्रमांमध्ये सहभागी होईल/कार्यक्रम राबवेल आणि खालील सर्व प्रकारच्या गोष्टीसाठी येणारा खर्च उचलेल.

१. संशोधन प्रकल्पांना आर्थिक मदत

२. विविध विभागांच्या आवश्यकतेनुसार उपकरणे, रसायने, नियतकालिके, पुस्तके आणि अशा अन्य आवश्यक वस्तुंची खरेदी.

३. विविध वास्तूंची दुरूस्ती आणि रूग्णालय/हॉस्पीटल करिता आवश्यक उपकरणांसाठी खर्च जो महानगरपालिकानिधीतून ताबडतोब मंजूर करता येणार नाही.

४. टो.रा वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाताव्दारे संशोधन किंवा विभाग प्रगती करिता नेमणूक करण्यता आलेल्या व्यक्तिंचे पगार, भत्ते आणि शिष्यवृत्ती.

५. विविध विभागांच्या संशोधनपर लेखांच्या प्रसिध्दिसाठी येणारा खर्च आणि शैक्षणिक आणि शास्त्रीय माहितीचा छपाई खर्च.

६. महानगरपालिका निधीबरोबर टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयाच्या कर्मचा-यांना वैद्यकीय परिषदा आणि चर्चासत्रांना उपस्थित राहण्यासाठी प्रवासखर्चास मदत.

७. विभागांव्दारा आयोजित वैद्यकीय परिषद, चर्चासत्र, चर्चासाठी खर्च.

लेखा परिक्षा - समितीने नियुक्त केलेल्या लेखापरिक्षेव्दारे केले जाते.

**समितीची रचना व सभासद पुढील प्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. आर.एन. भारमल | अधिष्ठाता/अध्यक्ष |
| २. | डॉ. जे.एम. जोशी | उपाध्यक्ष |
| ३. | डॉ. प्रेमलता वर्थकवी | सचिव |
| ४. | डॉ. मिनाक्षी बालसुब्रमण्यन | उप सचिव |
| ५. | डॉ. एम.व्ही. आंबिये | खजिनदार |
| ६. | डॉ. हेनल शहा | सभासद |
| ७. | डॉ. वृंदा कुलकर्णी | सभासद |
| ८. | शैलेश मोहिते | सभासद |
| ९. | डॉ. उदय भट | सभासद |
| १०. | डॉ. राधा घिल्डियाल | सह सभासद |
| ११. | डॉ. रेणूका मुन्शी | सह सभासद |

**कार्यालयाचा पत्ता** - महाविद्यालय इमारत, तळ मजला,
टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि
बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय,
डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल,
मुंबई - ४०० ००८.

सभेची वारंवारता - महिन्यातून एकदा जेव्हा जरूरी वाटत असेल तेव्हा
सभेमध्ये लोकांचा सहभाग - नाही.
सभेचे कार्यवृत्त तयार करणे - होय.

सही/-
डॉ. प्रेमलता वर्थकवी

(या समितीच्या सभेमध्ये रूग्णसमस्या समिती शिवाय इतर कोणालाही सहभागी होता येणार नाही)

## एच .आय.व्ही/एडस केंद्रीय समिती, बा.य.ल. नायर धर्मादाय रूग्णालय

**अ. समितीचे नांव –**

एच.आय.व्ही/एडस केंद्रीय समिती, टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा.रूग्णालय

**ब. पत्ता –**

समन्वयक, एच.आय.व्ही/एडस केंद्रीय समिती, प्राध्यापक विभागप्रमुख, रोगप्रतिबंधक आणि सामाजिक औषधशास्त्र विभाग खोली नं. १०३, महाविद्यालय इमारत टो.रा.वै. महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा.रूग्णालय, डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.

**क. सलग्न समितीचा प्रकार** – समिती

**ड. विसतृत ओळख –**

एच.आय.व्ही/एडस केंद्रीय गटाची रितसर स्थापना १९९९ मध्ये खालील उद्देशाकरीता झाली.

1. एच.आय.व्ही/एडस संबंधित सेवा आणि कार्याचे समन्वयन
2. एच.आय.व्ही/एडस संबंधित सेवा मध्ये सुधारणा घडवून आणणे.
3. एच.आय.व्ही/एडस संबंधित प्रतिबंध, नियंत्रण कार्यक्रम आणि सेवांमध्ये समन्वय राखणे.
4. संस्थेच्या वैद्यकीय आणि सहवैद्यकीय कर्मचारी यांना पुर्नप्रशिक्षाण कार्यशाळेचे आयोजन करणे.
5. एच.आय.व्ही/एडस बाधित जिवन जगणाऱ्यां संबंधित कार्य, माहिती घेण्याची पध्दती आणि माहितीचे व्यवस्थापन सुयोग्य पध्दतीने करणे.

**कार्ये:-**

रोगप्रतिबंधक आणि सामाजिक औषधशास्त्र विभागाच्या माध्यमाने स्वयसेवी संस्था, स्थानिकस्थरावर कार्य करणाऱ्या संस्थांचे कार्यकर्ते (कार्य करणारे) खाजगीरीत्या वैद्यकीय कर्मचारी डॉक्टर्स (जनरल प्रॅक्टीशनर) आणि संस्थेमधील वैद्यकीय कर्मचारी (डॉक्टर) तसेच सहवैद्यकीय (पॅरामेडिको) कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे.

1. एच.आय.व्ही/एडस रूग्णाकरीता विविधा वैद्यकीय शाखांचा सर्वसमावेशक स्वास्थविषयक घेणारा गट ज्यामध्ये रोगप्रतिबंधक आणि सामाजिक औषधशास्त्र

विभाग, वैद्यकीय विभाग, त्वचारोग व गुप्तरोग विभाग, प्रसुतीशास्त्र आणि स्त्रीरोग विभाग, स्वेच्छिक सल्लामसलत व तपासणी केंद्र, बालरोग विभाग आणि रक्तपेढी.

2. सुक्ष्मजीवशास्त्र विभागतर्फे – तपासणी आणि निदानाकरीता रक्त तपासणी केंद्र.
3. माहिती मिळविण्याची केंद्रे रोगप्रतिबंधक आणि सामाजिक औषधशास्त्र विभाग, वैद्यकीय विभाग, त्वचारोग व गुप्तरोग विभाग, प्रसुतीशास्त्र आणि स्त्रीरोग विभाग, स्वेच्छिक सल्लामसलत आणि तपासणी केंद्र, बालरोग विभाग आणि रक्तपेढी.
4. सुक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे – स्वेच्छिक तपासणी केंद्र
5. रक्तपेढी विभागातर्फे – रक्ताच्या सुरक्षिततेकरीता विभागीय रक्ततपासणी केंद्र
6. स्वेच्छिक सल्लामसलत आणि तपासणी केंद्र तसेच त्वचारोग आणि गुप्तरोग विभागातर्फे सलामसलत.
7. सर्व चिकित्सा विभागातर्फे – रूग्णांचे व्यवस्थापन करणे
8. सर्व चिकित्सा विभागातर्फे – संधीसाधू रोगांवर औषधोपचार करणे.
9. वैद्यकीय विभागतर्फे – अनावश्यक संसर्गाची इजा पोहोचल्यास घ्यावयाचा उपकार

१०. वरील सर्व विभागतर्फे – देखरेख करणे
११. सर्व विभागतर्फे – स्वास्थविषयक माहितीची पध्दत (नोंदणी घेणे व माहिती ठेवणे)
१२. वरील सर्व विभागतर्फे – माहितीचे व्यवस्थापन योग्य पध्दतीने करणे
१३. सेवा व आधार केंद्र – रोगप्रतिबंधक आणि सामाजिक औषधशास्त्र विभागतर्फे माहिती देणे, रूग्णांची बाजू समजून घेणे, त्यांना योग्य ते मार्गदर्शन व माहिती देणे आणि व्यवस्थापन करणे.

**इ. संलग्न गटाचे कार्य**

मार्गदर्शन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणी करणे, त्यासोबतच नियोजन करणे आणि माहिती देणे.

**फ. समितीची रचना व सहभाग**

**१**. अध्य क्ष - अधिष्ठाता

**२**. समन्वयक - विभागप्रमुख, रोप्रतिबंधक आणि सामाजिक औषधशास्त्र विभाग

**३**.स्वाक्षरीकर्ते - अधिष्ठाता विभाग प्रमुख वैद्यकीय विभाग
विभाग प्रमुख रोगप्रतिबंधक आणि सामाजिक वैद्यकशास्त्र विभाग

**४**. इतर सदस्य १. विभाग प्रमुख, बालरोग विभाग

२. विभाग प्रमुख, त्वचारोग आणि गुप्तरोग विभाग
३. विभाग प्रमुख, प्रसुतीशास्त्र आणि स्त्रीरोग विभाग
४. विभाग प्रमुख, शल्यचिकित्सा विभाग
५. विभाग प्रमुख, सुक्ष्मजीवशास्त्र
६. विभाग प्रमुख, रक्तपेढी
७. विभाग प्रमुख, श्वसन विकार वैद्यकशास्त्र
८. समन्वयक, सेवा व आधार केंद्र

या व्यतिरिक्त वरील विभागांच्या प्रत्येक विभागप्रमुखाद्वारे नेमण्यात आलेला एखादा कर्मचारी केंद्रीय समितीचा सभासद असेल.

या व्यतिरिक्त वरील विभागांच्या प्रत्येक विभागप्रमुखाद्वारे नेमण्यात आलेला एखादा कर्मचारी केंद्रीय समिती सभासद असेल.

ज.   समिती प्रमुख   अधिष्ठाता

**कार्यालयनी पत्ता**

एचआयव्ही/एडस केंद्रीय समिती,
रोगप्रतिबंधक आणि सामाजिक वैद्यकशास्त्र विभाग,
खोली नं. १०३, महाविद्यालय, इमारत,
टो.रा.वै. महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा.रूग्णालय
डॉ.ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.

य.   सभेची कालमर्यादा   -   दर दोन महिन्याची सभा घेण्यात येते

र.   लोकांचा सहभाग सभेत असतो का   -   नाही

ल.   सभेचा अहवाल तयार करण्यात येतो का   -   होय

सही/-
डॉ.**सुर्यवंशी**

# रिसर्च सोसायटी बा.य.ल. नायर धर्मा रूग्णालय व टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय

बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालयाच्या ‘‘रिसर्च सोसायटी‘‘ ची स्थापना १९६४ साली झाली. ही सोसायटी सार्वजनिक धर्मादाय संस्था असुन त्याची नोंदणी धर्मादाय आयुक्त मुंबई यांच्याकडे २३.१०.१९६४ रोजी झालेली आहे. (रजि.क्र. BOM/104/1964 6B BSD F/1214) बा.य.ल. नायर धर्मा.रूग्णालय व टो.रा.वै. महाविद्यालयात कार्यरत असणारे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता आणि मानद प्राध्यापक हे हया सोसायटीचे सभासद आहेत.

**ध्येय व धोरणे** :

1. विविध वैद्यकीय शोधांना प्रोत्साहन देणे.
2. विविध वैद्यकीय शोधांना आर्थिक पाठबळ देणे.
3. वरील ध्येय साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.

वैद्यकीय क्षेत्रातील प्राथमिक व रूग्ण संबंधातील शोध कार्यास मदत करणे हे रीसर्च सोसायटीचे ध्येय आहे.

रीसर्च सोसायटीच्या कार्यसमितीत १५ सभासद आहेत. नायर रूग्णालयात काम करणारे वरिष्ठ वैद्यकीय शिक्षक हे हया सोसायटीचे सभासद आहेत. दरवर्षी साधारणतः १० ते ४० (पूर्ण किंवा भाग) वैद्यकीय शोध कार्यांना आर्थिक पाठबळ दिले जाते. बा.य.ल. नायर रूग्णालय व टो.रा.वै. महाविद्यालयातील अनेक सभासद हयांचा उपयोग आपआपल्या शोध कार्यासाठी करून घेतात.

हया सोसायटीची नोंदणी डायरेक्टर ऑफ सायंटिफिक ऍन्ड इंडस्ट्रीयल रीसर्च ऑर्गनायझेशन ऑफ डिपार्टमेंट ऑफ सायन्स ऍन्ड टेक्नॉलॉजी नवी दिल्ली यांच्याकडे झालेली आहे व कलम ३५ (I) (II) खाली आयकरात सूट आहे.

रीसर्च सोसायटीच्या कार्यकारणीची(कार्य समितीची) बैठक दर महिन्याला होते, रीसर्च सोसायटीची सर्वसाधारण सभा वर्षाला एकदा होते. हया सर्व बैठकांचा तपशील ठेवला जातो. हया सोसायटीच्या कार्यकारणीतील सभासद हयाप्रमाणे आहेत.

# समिती सदस्यांची यादी

| अ.क्र. | नाव | पद | पत्ता |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ. रमेश भारमल | अध्यक्ष | अधिष्ठाता, बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय आणि टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय मुंबई - ०८ |
| ०२. | डॉ. एस.बी. बावडेकर | उपाध्यक्ष | प्राध्यापक व विभाग प्रमुख, बालरोगचिकित्सा, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ०३. | डॉ. जी.सी. राजाध्यक्ष | उपाध्यक्ष | प्राध्यापक, वैद्यकशास्त्र विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ०४. | डॉ. चित्रा नायक | सचिव | प्राध्यापक व विभाग प्रमुख, त्वचा व गुप्तरोग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ०५. | डॉ. रेणूका मुन्शी | सह सचिव | सहयोगी प्राध्यापक, चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ०६. | डॉ. एस.जी. जैन | खजिनदार | सहा. प्राध्यापक, रोगप्रतिबंधक आणि सामाजिक वैद्यकशास्त्र विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ०७. | डॉ. चित्रा पिल्लई | सदस्य | अति. प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ०८. | डॉ. अनुराधा डे | सदस्य | प्राध्यापक, सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ०९. | डॉ. निलम पाटील | सदस्य | प्राध्यापक, जीवरसायनशास्त्र विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| १०. | डॉ. राहूल चकोर | सदस्य | प्राध्यापक व विभाग प्रमुख, मज्जातंतूशास्त्र, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| ११. | डॉ. अविनाश इंगोल | सदस्य | अति. प्राध्यापक, नेत्रशल्यचिकित्सा विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय धर्मा. रूग्णालय, मुंबई – ०८. |
| १२. | डॉ. एम.के. हसे | सह सदस्य | प्राध्यापक व विभाग प्रमुख, मूत्रपिंडोपचार, सेठ गो.सु. वैद्यकीय महाविद्यालय आणि रा.ऐ. स्मारक रूग्णालय, परळ, मुंबई – १२. |
| १३. | डॉ. निर्मला रेगे | सह सदस्य | प्राध्यापक व विभाग प्रमुख, औषधशास्त्र विभाग, सेठ गो.सु. वैद्यकीय महाविद्यालय आणि रा.ऐ. स्मारक रूग्णालय, परळ, मुंबई – १२. |
| १४. | डॉ. सतिष धरप | सह सदस्य | प्राध्यापक, सर्वसाधारण शल्यचिकित्सा विभाग, लो.टि.म.स. रूग्णालय, सायन, मुंबई – २२. |
| १५. | श्री. अजोय मेहता | | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई – ०१. |

सही/-

डॉ. चित्रा नायक

# प्रयोगशाळा समिती

**पत्ता :** विकृतीशास्त्र
टो.रा.वै. महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा.रूग्णालय,
डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल समिती, मुंबई - ०८

**सांलग्नित समितीचा प्रकार** समिती

**संक्षिप्त माहिती** : सन २००१ मध्ये सदर समितिची स्थापना करण्यात आली.

**उद्देश**

अ) विविध प्रयोगशाळांच्या कार्यामध्ये सुसुत्रता आणणे.

ब) दर्जा मुल्यांकन पध्दतीने अवलंब कार्यरत ठेवणे.

क) वैद्यकीय अधिकाऱ्यांबरोबर रूग्णांच्या आजारासंबंधित प्रश्नांसंबंधी वेळोवेळी चर्चा करणे. याची मुख्य संकल्पना अशी होती की, अंतर्गत रूग्ण विभागातील रूग्णांचे रक्त,लघवी इ.चे नमुने एकत्र गोळा करून ते जीवरसायनशास्त्र विभाग, रक्तपेशी व परजीवी चाचणी विभाग, व सुक्ष्मजीवशास्त्र विभाग या विभागाकडे त्यांचेच नमुने पाठविणे आणि ही पध्दत सन २००१ पासून आजपर्यंत यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहे.

**संरचना व सभासदत्व**

मान्यवर सभासद – प्राध्यापक व विभाग प्रमुख – विकृतीशास्त्र विभाग, मान्यवर सहसभासद – विभाग प्रमुख सुक्ष्मजीवशास्त्र विभाग आणि सहयोगी प्राध्यापक, विकृतीशास्त्र विभाग,

**इतर सभासद** – औषधशास्त्र, बधिरीकरणशास्त्र, बालरोग विभाग, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग, शल्यचिकित्सा विभाग, वैद्यकीय औषधशास्त्र या सर्व विभागांचे प्रतिनिधी ,

**समिती प्रमुख** - प्राध्यापक व विभाग प्रमुख (विकृतीशास्त्र विभाग)

**मुख्य कार्यालय व त्याच्या शाखा यांचा पत्ता –**
विकृतीशास्त्र विभाग, तिसरा मजला, टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय इमारत, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८

**सभेची वारंवारता** - सन २००२ मध्ये २ सभा घेण्यात आल्या, वर्षातून दोनदा.

**सर्वसामान्य जनता सभेमध्ये सहभागी होऊ शकते का** - नाही

**सभेचे वृतांत तयार केले जाता का** - होय.

सन २००२ मध्ये झालेल्या सभेचे इतिवृतांत तयार केले होते आणि त्याच्या प्रति विविध विभागांना सुपूर्द करण्यात आल्या होत्या.

**सही/-**
डॉ.जी.व्ही. पुराणिक

# रूग्णालय रक्तसंक्रमण समिती

**संलग्नित समितीचा प्रकार** - समिती
**समिती स्थापना वर्ष** - डिसेंबर २००१

रूग्णालय रक्तसंक्रमण समिती ही प्रत्येक रूग्णालयाच्या अधिकृत परवानाधन रक्तपेढी अनिवार्य बाब आहे. त्याप्रमाणे राष्ट्रीय रक्तसंक्रमण धोरणानुसार ही अशी समिती अनिवार्य आहे.

**प्रमुख उद्देश** –

1. रक्त व रक्तघटकांचा सुयोग्य वापर करणे.
2. रक्त व रक्तघटकांच्या सुयोग्य वापरासाठी वैयक्तिक प्रशिक्षण देणे.
3. रक्त संक्रमणानंतर क्वचित उद्धवणाऱ्या संभाव्य धोकादायक प्रतिक्रियांचे योग्य प्रकारे मुल्यमापन करणे.
4. अन्य रूग्णालयातील रूग्णांसाठी रक्त संक्रमण आणि प्रत्यारोपण या संदर्भातील प्रशासकीय तत्वे निश्चित करणे.
5. रक्त जुळणी नंतर रूग्णांसाठी रक्त राखीव ठेवण्यासंदर्भातील प्रशासकीय तत्वे निश्चित करणे.
6. खालील बाबींचे लेखा परिक्षण करणे.

अ) रक्तमागणी पत्रकातील सर्व अनिवार्य बाबींचा तपशिल
ब) रक्त संक्रमणानंतर उद्धवणाऱ्या धोकादायक प्रतिक्रियांचा तपशिल
क) रक्त व रक्त घटकांचे संपूर्णत सुयोग्य वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार वेळोवेळी रक्त मागणी पत्रकामध्ये करण्यात येणारे बदल.

**संरचना व सभासदत्व**

अध्यक्ष – अधिष्ठाता, नायर रूग्णालय
सचिव – रक्तपेढीचे प्रभारी अध्यक्ष
**सभासद –** खालील विभागांचे प्राध्यापक व विभाग प्रमुख यांचा सभासदांमध्ये समावेश आहे. विकृतीशास्त्र विभाग, शल्य चिकित्सा

# संसर्ग नियंत्रण समिती

| | | |
|---|---|---|
| १. | समितीशी निगडीत असलेल्या शाखेचे नाव व पत्ता | हॉस्पीटल इनफेक्शन कंट्रोल कमिटी सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय मुंबई - ४०० ००८. |
| २. | संस्थेचे प्रकार | समिती |
| ३. | समित्यांची थोडक्यात माहिती | एचआसीसी-इनफेक्शन कंट्रोल प्राटोकॉल्स, शस्त्रक्रिया विभागाचे परिक्षण, घनकचरा व्यवस्थापन. |
| ४. | संस्थेचे कार्य | इनफेक्शन कंट्रोल प्राटोकॉल्स, सल्ला देणे, जागरूकता निर्माण करणे, शिक्षण व परिक्षण देणे, मार्गदर्शन करणे, शस्त्रक्रिया विभागाचे परिक्षण, घनकचरा व्यवस्थापन. |
| ५. | सहभागी असलेले सदस्य | एचआसीसी, संयोजन, प्राध्यापक व प्रमुख सुक्ष्मजीवशास्त्र विभाग<br>सह-संयोजक, प्राध्यापक व प्रमुख शल्यचिकित्या विभाग सचिव,<br>सदस्य - उप अधिष्ठाता, सहा. अधिष्ठाता, प्राध्यापक व विभाग प्रमुख मेडीसीन, बालरोग, स्त्रीरोग, बधिरीकरण विभाग, सी.व्ही.टी.एस., कान-नाक-घसा विभाग, गॅस्ट्रोएन्टोलॉजी, नुफरोलॉजी, स्त्रीरोगविभाग, नेत्ररोग विभाग, न्युरोसर्जरी, अस्थिरोग विभाग, घटनशल्यचिकित्सा, बालरोगशल्यचिकित्सा, उरोरोग, विभाग, इन्चार्ज अतिदक्षता विभाग, इन्चार्ज नवजात शिशुअतिदक्षता विभाग, संसर्ग नियंत्रण समन्वयक, मेट्रन, ओटी सुप्रीटन्डअ, विभागप्रमुख रक्तपेढी, इन्फेक्शन कंट्रोल परिचारीका, सिस्टर इन्चार्ज, दुय्यम अभियंता (यां व वि.) दुय्यम अभियंता (स्था) फार्मसी व्यवस्थापक, मुख्यलिपिक - औषध भांडार, मुख्यलिपिक - सर्वसाधारण भांडार, मुख्यलिपिक - (श्री. मुरुडकर), सुरक्षा अधिकारी, समय लेखक, ओआरएम रूग्णालयाचे अधिष्ठाता |
| ६. | संस्था प्रमुख (अध्यक्ष) | रूग्णालयाचे अधिष्ठाता |
| ७. | मुख्य कार्यालयाचा पत्ता | टो.रा. वैद्यकीय महाविद्याल व बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय, मुंबई - ४०० ००८. |
| ८. | सभेची वारंवारता | दर तीन महिन्यांनी |

९. नागरिक सहभाग घेऊ शकतात का नाही

१०. सभेचा अहवाल तयार केला जातो का होय

सही/-

डॉ. जे.एस. शास्त्री

# पदवीपूर्व शैक्षणिक समिती (प्रथम वर्ष एम.बी.बी.एस.)

**संलग्न कार्यकरिणीचा प्रकार** - समिती

**स्थापना वर्ष** - ऑक्टोबर १९९९

**संक्षिप्त माहिती** - प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. पातळीवर शैक्षणिक कार्यात सुसूत्रता आणणे या उद्देशाने समितीची स्थापना केली.

**उद्दीष्टे** -

१. प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. विषयांकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाने नेमलेल्या अभ्यासक्रमांतर्गत वार्षिक अभ्यासवर्गाची आखणी करणे.

२. प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. वर्गाकरिता चाचण्या, सहामाही आणि पूर्व वार्षिक परिक्षांचे वेळापत्रक तयार करणे व अंमलात आणणे.

३. विद्यार्थ्यांशी विचारविनिमय, सल्ला मसलत करणे व त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करणे.

४. विविध विषयांच्या परिपूर्ण माहितीसाठी विद्यार्थ्याचे परिसंवाद आयोजित करणे.

५. प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाच्या अभ्यास क्रमातील संलग्न विषय संकलीत करून त्यांचा चर्चात्मक समन्वय साधणे. (इंटिग्रेटेड टिचिंग)

समितीचे मुख्य उपक्रम -

१. प्रथम वर्ष वैद्यक वर्गाकरिता त्या विषयांसाठी वार्षिक अभ्यासक्रमाची आखणी कारणे.

२. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या आदेशानुसार चाचण्या, सहामाही व पूर्व वार्षिक परिक्षांचे वेळापत्रक तयार करणे.

३. वरील परिक्षांमध्ये नापास होणा-या आणि शिक्षणात मागे पडणा-या विद्यार्थ्यासाठी उजळणी वर्ग तसेच जास्तीचे शैक्षणिक वर्ग घेऊन त्यांचा दर्जा उंचविण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करणे.

४. वेळोवेळी शिकण्यासाच्या पध्दतीसंबंधी अध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांची मते जाणून घेऊन त्यानुसार अभ्यासक्रम शिकविण्याच्या पध्दतीमध्ये आवश्यक तो बदल करणे.

५. प्रत्येक विषयासाठी प्रश्नसंचांचा संग्रह तयार करणे.

६. वार्षिक परिक्षेकरिता विद्यार्थ्यांची उपस्थिती व अभ्यासातील गुणवत्ता या निकषांवर शिफारस करणे.

**संरचना व सभासत्व -**

प्राध्यापक विभाग प्रमुख शरिररचना शास्त्र विभाग, जिवरसयनशास्त्र विभाग, शरिरक्रियाशास्त्र विभाग हे समिती सदस्य आहेत.

समिती प्रमुख -

प्राध्यापक व विभाग प्रमुख - शरिररचना शास्त्र विभाग.

**मुख्य कार्यालय व त्याच्या शाखा यांचा पत्ता -**

शरिररचना शास्त्र विभाग, पाचवा मजला,
टो.रा वैद्यकीय महाविद्यालय इमारत,
डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल,
मुंबई - ४०० ००८.

**सभेची वारंवारता** - वर्षातून चारवेळा.

सही/-
डॉ. मेधा वि. आंबिये

# पदवीपूर्व शैक्षणिक समिती (व्दितीय वर्ष एम.बी.बी.एस.)

**पत्ता** - विकृतीशास्त्र विभाग,
टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय,
डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.

**संलग्न समितीचा प्रकार** — समिती

**संक्षिप्त माहिती** - व्दितीय वर्ष एम.बी.बी.एस. पातळीवर शैक्षणिक कार्यात सुसूत्रता आणणे या उद्देशाने समितीची स्थापना केली.

**संलग्नीत समितीची भूमिका** -
अ) परिक्षार्थी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रगतीचा अहवाल, उपस्थिती, अंतर्गत मुल्यांकन इत्यादी पदव्युत्तर शिक्षण विभागाला सादर करणे.
ब) व्दितीय वर्ष एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक व लेखी परिक्षांच्या वेळापत्रकाबद्दल येणा-या अडचणीबाबत चर्चा करणे.
क) व्दितीय वर्ष एम.बी.बी.एस. च्या सराव परिक्षा व सत्र परिक्षांचे विविध तुकडयांमध्ये आयोजन करण्याबाबत चर्चा करणे.
ड) व्दितीय वर्ष एम.बी.बी.एस. विद्यार्थी व अध्यापक वर्ग यांच्याशी संबंधीत इतर अडचणी याविषयी चर्चा करणे.
**संरचना व सभासत्व** -
प्राध्यापक व विभाग प्रमुख विकृतीशास्त्र विभाग, औषधनिर्माणशास्त्र विभाग, सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, न्यायवैद्यकशास्त्र विभाग हे समिती सदस्य आहेत.
**समिती प्रमुख** - प्राध्यापक व विभाग प्रमुख - विकृतीशास्त्र विभाग.

मुख्य कार्यालय व त्यांच्या शाखा यांचा पत्ता -
विकृतीशास्त्र विभाग,
तिसरा मजला,
टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय इमारत,
डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.

**सभेची वारंवार** - वर्षातून दोनदा

**सर्वसामान्य जनता सभेमध्ये सहभागी होऊ शकते का** - नाही.

**सभेचे वृत्तांत तयार केले जातत का** - औपचारिक वृत्तांत तयार केला जात नाही.

सही/-

डॉ. जी.व्ही. पुराणिक

## विद्यार्थी जिमखाना समिती

| | |
|---|---|
| संबंधित समितीचे नाव व पत्ता | विद्यार्थी जिमखाना समिती<br>टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय विद्यार्थी जिमखाना,<br>टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय इमारत,<br>डॉ. ए.एल. नायर रोड,<br>मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८. |
| संलग्नित समितीचा प्रकार | समिती |
| संबंधित समितीची संक्षिप्त माहिती | एमसीआय/युनिव्हर्सिटी च्या मान्यतेनुसार हया महाविद्यालय आस्थापनाच्या अस्तित्वापासून चालू आहे. विद्यार्थ्यांच्या क्रिडा आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणासंदर्भात. |
| संबंधित समितीचे कार्य | सल्लागार व व्यवस्थापन मंडळी |
| सदस्य आराखडा | अधिष्ठाता,<br>शिक्षण विभागातील अध्यक्ष,<br>उपअध्यक्ष, विद्यार्थ्यापैकी एक चिटणीस<br>१ सर्वसाधारण चिटणीस<br>२ सांस्कृतिक चिटणीस<br>३ क्रिडा समिती चिटणीस<br>१ लीट आणि डेब चिटणीस<br>१ हिशोब तपासणी चिटणीस<br>१ अहवाल चिटणीस |
| अध्यक्ष व कार्यालयीन पत्ता | अधिष्ठाता (अध्यक्ष)<br>टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय,<br>विद्यार्थी जिमखाना, महाविद्यालय इमारत<br>डॉ. ए.एल. नायर मार्ग,<br>मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८. |
| सभेचा कालावधी | तीन महिन्यातून एकदा व आवश्यकतेनुसार |
| बाहेरील व्यक्ती सदर मिटिंगकरीता उपस्थित राहू शकते का | नाही. |
| सभेचे इतिवृत्त घेतले जाते का | होय. |

सही/-

डॉ. प्रमोद सकपाळ

# विद्यार्थी जिमखाना उपहारगृह समिती

| | |
|---|---|
| नाव व पत्ता | विद्यार्थी जिमखाना उपहारगृह समिती<br>टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय विद्यार्थी<br>डॉ. ए.एल. नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८. |
| संलग्नित समितीचा प्रकार | समिती |
| संबंधित समितीचे संक्षिप्त माहिती | महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षकीय विद्या विभागाच्या गरजेनुसार एम.सी.आय./विद्यापीठ मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय आस्थापीत झाल्यापासून प्रारंभ |
| संबंधित समितीचे कार्य | व्यवस्थापक व सल्लागार |
| समितीचा आराखडा | अधिष्ठाता (अध्यक्ष)<br>शैक्षणिक विद्या विभागातील सदस्यामध्ये विद्यार्थ्या पैकी एकास निवडून दिले जाते. (चिटणीस) विद्यार्थ्यामधून निवडलेले असतात. |
| अध्यक्ष व कार्यालयीन पत्ता | अधिष्ठाता<br>टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय विद्यार्थी जिमखाना उपरहार महाविद्यालय इमारत, डॉ. ए.एल. नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८. |
| सभेचा कालावधी | वर्षातून एकदा व मागणीनुसार |
| बाहेरील व्यक्ती सदर मिटिंगकरिता उपस्थित राहू शकतो का | नाही. |
| सभेचे इतिवृत्त घेतले जाते का | होय. |

सही/-

डॉ. पंकजा आगल

# बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट

| | |
|---|---|
| संबंधित कामाचे नाव | बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट<br>टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय, मुंबई - ४०० ००८. |
| संबंधित कामाचा प्रकार | समिती |
| संबंधित कामाची थोडक्यात प्रस्तावना | कामगार वर्ग आणि उपचर्या कर्मचारी समिविष्टीत सर्व कर्मचारी यांना टाकाऊ वस्तू वेगळया कशा करतात याबाबतचे प्रशिक्षण व माहिती दिली जाते. श्र---देऊन कामावर देखरेख ठेवली जाते. |
| सदस्यांचा आराखडा | खाते/विभाग प्रमुख<br>शल्यचिकित्सा सुक्ष्मजीवशास्त्र, वैद्यकशास्त्र, बालरोगशल्य, स्त्रीरोग प्रसुतीशास्त्र, उप अधिष्ठाता, सहाय्यक अधिष्ठाता, अधिसेविका, सहा. अभियंता (स्थापत्य), सहा. वैद्यकीय अधिकारी, टाईम किपर, परिसेविका, पाठय निर्देशक, परिसेविका. |
| अध्यक्ष | डॉ. रमेश ना. भारमल<br>अधिष्ठाता, टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय, मुंबई - ४०० ००८. |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता | टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय, डॉ. ए.एल. नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई – ०८. |
| सभेचा कालावधी | महिन्यातून दोनदा आणि अत्यावश्यक तेव्हा |
| बाहेरील व्यक्ती सभेत सामिल होऊ शकतात का | लागू नाही. |
| सभेचे इतिवृत्तांत घेतात का | होय. |

| | |
|---|---|
| बायो मेडिकल वेस्टची उद्दीष्टे | केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ हयांच्या मार्गदर्शनाप्रमाणे १९९९ पासून हे रूग्णालय जैवीक वैद्यक कचरा व्यवस्थापन व हाताळणी करीत आहेत. |

१) संसर्ग दोषांवर नियंत्रण ठेवण्यासाठी टाकाऊ वस्तूंचा पुर्नवापर टाळण्यात येतो.

२) टाकाऊ कचरा हा सुर्वातीला संसर्गजन्य, संसर्गजन्य नसलेला प्रकार वेगळया कंटेनर्स मध्ये वेगळा केला जातो.

३) टाकाऊ कचरा ठेवण्याकरीता वेगवेगळया कलरच्या संकेतांक पिशव्यामध्ये जमा केला जातो.

४) वैद्यक कचरा वाहून नेण्याचे काम खाजगी कंत्राटदार आणि बृहन्मुंबई महानगरपालिका वाहनांकडून केली जाते.

सही/-

उप अधिष्ठाता

# पदवीपूर्व शैक्षणिक समिती – तृतीय वर्ष वैद्यक

संलग्न कार्यकारिणाचा प्रकार : समिती
स्थापना वर्ष : ऑक्टोबर 1999

**उद्दीष्टे –**

1. तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. विषयांकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नेमलेल्या अभ्यासक्रमांतर्गत वार्षिक अभ्यासवर्गाची आखणी करणे.
2. तृतीय वर्ष वर्गाकरिता चाचण्या, सहामाही आणि पूर्व वार्षिक परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे व अंमलात आणणे.
3. विद्यार्थ्यांशी विचारविनिमय, सल्ला मसलत करणे व त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करणे.
4. विविध विषयांच्या परिपूर्ण माहितीसाठी विद्यार्थ्यांचे परिसंवाद आयोजित करणे.
5. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातील संलग्न विषय संकलीत करुन त्यांचा चर्चात्मक समन्वय साधणे (इंटीग्रेटेड टिचींग)

**जबाबदा-या –**

वैद्यकीय व निमवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमाची आखणी करणे.

**समितीचे मुख्य उपक्रम :**

1. तृतीय वर्ष वैद्यक वर्गाकरिता त्या विषयांसाठी वार्षिक अभ्यासक्रमाची आखणी करणे.
2. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या आदेशानुसार चाचण्या, सहामाही व पूर्व वार्षिक परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे.
3. वरील परीक्षांमध्ये नापास होणा-या आणि शिक्षणात मागे पडणा-या विद्यार्थ्यांसाठी उजळणी वर्ग, तसेच जास्तीचे शैक्षणिक वर्ग घेऊन त्यांचा दर्जा उंचविणयासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करणे.
4. वेळोवेळी शिकण्याच्या पध्दतीसंबंधी अध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांची मते जाणून घेऊन त्यानुसार अभ्यासक्रम शिकवण्याच्या पध्दतीमध्ये आवश्यक तो बदल करणे.
5. प्रत्येक विषयासाठी प्रश्नसंचांचा संग्रह तयार करणे.
6. वार्षिक परीक्षेकरिता विद्यार्थ्यांची उपस्थिती व अभ्यासातील गुणवत्ता या निकषांवर शिफारस करणे.

7. दरवर्षी विद्यापीठाने घेतलेल्या वार्षिक परीक्षांचे निकाल लक्षत घेऊन गरजेनुसार अभ्यासक्रम विकसीत करणे.

**संलग्न कार्यकारिणीची भूमिका -**

**पदवीपूर्व समिती**

१) डॉ. एम.के. संजना - प्राध्यापक व विभाग प्रमुख सर्वसाधारण शल्यचिकित्सा

२) डॉ. डि.जे असगांवकर - प्राध्यापक व विभाग प्रमुख वैद्यकशास्त्र

३) डॉ. एस. भावडेकर - प्राध्यापक व विभाग प्रमुख बालरोगशल्यचिकित्सा

४) डॉ. राधा गिधीयाल - प्राध्यापक

५) डॉ. ऐ.आर. दलाल - प्राध्यापक व विभाग प्रमुख स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र

६) डॉ. एस. शिरोडकर - प्राध्यापक स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र

७) डॉ. चिंग लिंग - सहयोगी प्राध्यापक

८) डॉ. ए.एन. पारिख - प्राध्यापक व विभाग प्रमुख अस्थिव्यंगपोचार

९) डॉ. जयेश बाविसकर - सहाय्यक प्राध्यापक

सही/-

डॉ. एम.के. संजना

# वसतीगृह सुधार समिती

1) समितीचे नांव - वसतीगृह सुधार समिती
ही समिती टि.एन.मेडीकल कॉलेज विद्यार्थी जिमखाना समितीच्या अंतर्गत समाविष्ट आहे.

2) ध्येय - ही पाच वर्षापूर्वी तयार केली.
अ) हाजीअली येथील एमबीबीएसच्या वसतीगृहामध्ये मुलांची राहण्याची व्यवस्था बघणे तसेच काही सुधारणा करावयाच्या असल्यास त्याबद्दल निर्णय घेणे.
ब) विद्यार्थ्यांचे रॅगींग थांबवणे.

3) समितीचे सदस्य- अधिष्ठाता हे समितीचे प्रमुख असतात.
इतर सदस्य वॉर्डन, दोन सहाय्यक वॉर्डन (मुलांचे व मुलीचे) आणि 8-10 सदस्य हे वेगवेगळया विभागातून घेतले जातात.

4) सभेचा कालावधी- वर्षातून 6-8 वेळी मिटींग होतात व गरज पडल्यास तातडीची बैठक बोलावली जाते.

5) पत्ता - वॉर्डन क्वार्टर्स, टी.एन.मेडीकल कॉलेज होस्टेल, विलींग्टन स्पोर्ट क्लबच्यासमोर, हाजीअली, मुंबई 400 034

6) सर्वसाधारण लोक अथवा इतर कोणीही हया समितीमध्ये समावेश करत नाहीत.

सही/-
डॉ. संदिप भेटे

# पोस्टग्रॅज्युएट ॲकेडमिक कमिटी (नितीमूल्यावलोकन समिती)
# पदव्युत्तर शैक्षणिक समिती

**पदव्युत्तर शैक्षणिक समिती स्थापन करण्याची उद्दीष्टे**

1) पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संशोधनपर निबंधाच्या संक्षिप्त माहितीची पडताळणी करुन त्याची गुणवत्ता परमाणित करणे.
2) नितीमत्ता समितीची मान्यता मिळण्यापूर्वी संशोध्न कार्याच्या नितीमत्ता बाजूची पडताळणी करुन पाहणे.
3) पदव्युत्तर विद्यार्थी व अध्यापक वर्ग यांच्यासाठी 'संशोधन प्रक्रीया व वैज्ञानिक देवाणघेवाण याकरिता कार्यशाळा आयोजित करणे.
4) पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सभा व चर्चासत्रे आयोजित करणे.

पदव्युत्तर शैक्षणिक समितीची सभा महिनयातून कमीत कमी एकदा तरी व गरज भासेल त्याप्रमाणे घेतली जाते.

**हया समितीमध्ये खालील सदस्य समाविष्ट आहेत.**

| अ.क्र. | नाव | पद | विभाग |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ. रेणूका मुंन्शी | आयोजक<br>सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन औषधास्त्र विभाग |
| ०२. | डॉ. प्रविण राठी | प्राध्यापक आणि<br>विभाग प्रमुख | जाठरआंत्रिक विभाग |
| ०३. | डॉ. डि.एस. आसगांवकर | प्राध्यापक आणि<br>विभाग प्रमुख | वैद्यकशास्त्र विभाग |
| ०४. | डॉ. राजन नेरूरकर | प्राध्यापक | औषधाशास्त्र विभाग |
| ०५. | डॉ. राधा गिलीदियाल | प्राध्यापक | बालरोगचिकित्सा विभाग |
| ०६. | डॉ. राजीव जोशी | प्राध्यापक | सर्वसाधारण शल्यचिकित्सा विभाग |
| ०७. | डॉ. सी.एम. देशपांडे | प्राध्यापक | बधिरीकरणशास्त्र विभाग |
| ०८. | डॉ. चित्रा पिल्लई | प्राध्यापक (अति.) | शरीरक्रियाशास्त्र विभाग |
| ०९. | डॉ. रिना सेठ | प्राध्यापक (अति.) | सुक्ष्मजीवशास्त्र विभाग |
| १०. | डॉ. अंजली अमरपुरकर | प्राध्यापक (अति.) | विकृतीशास्त्र विभाग |
| ११. | डॉ. यास्मीन काझी | सहाय्यक प्राध्यापक | सामाजिक रोगप्रतिबंधक विभाग |

सही/-
डॉ. रेणूका मुंन्शी

# वैद्यकीय शिक्षण आणि शैक्षणिक तंत्रविज्ञान कक्ष

कोणत्या प्रकाराची संलग्नीत संस्था - समिती

**उद्दीष्टे**

1. शिक्षक कर्मचा-यांना शैक्षणिक तंत्रज्ञान सुकर करुन देणे.
2. वैद्यकीय शिक्षाण शास्त्रात तंत्रज्ञान विषयक होणारे नवनवीन बदल. तसेच अत्याधुनिक विचार यासंबंधी माहिती देणे.
3. एका वर्षामध्ये 4 वेळा समितीची सभा होते.
4. एका वर्षात 2 वेळा परशिक्षाण शिबीर घेतली जातात.

**समिती -**

| | |
|---|---|
| निमंत्रक | - डॉ. रमेश भारमल (अधिष्ठाता) |
| सल्लागार समिती | - डॉ. मिनू संजना |
| | - डॉ. प्रमा वर्थकवी |
| | - डॉ. संदीप बावडेरक |
| प्रकल्प अधिकारी | - डॉ. वृंदा कुलकर्णी |
| समिती सचिव | - डॉ. अश्विनी कर्वे |
| | - डॉ. सिमा खंबाट |
| समिती सदस्य | - डॉ. अनुराधा कान्हेरे |
| | - डॉ. जयश्री पंडया |
| | - डॉ. बच्ची हाथीराम |
| | - डॉ. राजन नेरूरकर |
| | - डॉ. ज्योती मोहिते |
| | - डॉ. चिंग लिंग |
| | - डॉ. हेनल शहा |
| | - डॉ. सुनिता कौतारपू |
| | - डॉ. सरिता फर्नांडिस |
| | - श्रीमती. प्रतीभा वैद्य |
| | - डॉ. गायत्री मुथीयन |
| | - डॉ. संतोष कोंडेकर |

सही/-

वृंदा कुलकर्णी

# बा.य.ल.नायर धर्मा. रूग्णालय

## कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैगिंग छळाच्या प्रतिबंधाची तक्रार समिती

**मंडळाचा प्रकार** समिती

**समितीचे स्थापना वर्ष** नोव्हेंबर २००२

सर्वोच्च न्यायालयाच्या नियमावलीनुसार, संस्थेमध्ये सदर समितीचे आवश्यकता असल्यामुळे समितीची स्थापना केली.

**मंडळाची प्रमुख उद्दीष्टे -**

१. हया संस्थेमध्ये काम करणा-या महिलांच्या सुरक्षिततेची हमी.

२. सर्वोच्च न्यायालयाच्या नियमावलीचे पालन करणे.

३. महिला कामगारांच्या लैगिंग छळाला प्रतिबंध करणे.

**लेखा परिक्षण** लागू नाही

**रचना व सभासद बांधणी -**

| अ.क्र. | नाव | पद | पत्ता | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. रमेश भारमल | अधिष्ठाता | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७१०१ |
| ०२. | डॉ. एम.व्ही. अंभिये | अध्यक्ष, प्राध्यापक व विभागप्रमुख शरीररचनाशास्त्र | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७१६५ |
| ०३. | श्रीम. प्रभा तिरमारे | एनजीओ सदस्य | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | ९८१९६१०४२० |
| ०४. | डॉ. ए.एम. कान्हेरे | सचिव, प्राध्यापक जिवरसायनशास्त्र विभाग | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७१६४ ९८६९०६५७०३ |
| ०५. | डॉ. पुष्पा पझारे | प्राध्यापक व विभाग प्रमुख शरीरक्रियाशास्त्र विभाग | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७१५९ |
| ०६. | डॉ. एम.के. संजना | प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७१४८ ९७५७११०३०३ |
| ०७. | डॉ. सुर्यवंशी | प्राध्यापक व विभाग प्रमुख | बा.य.ल. नायर धर्मा. | २३०२७१२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सामाजिक रोगप्रतिबंधक विभाग | रूग्णालय | |
| ०८. | डॉ. व्हि.एस. तांडेल | सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७४११ |
| ०९. | डॉ. राकेश भदाडे | सहयोगी प्राध्यापक, वैद्यकशास्त्र विभाग | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७१२२ |
| १०. | डॉ. प्राजंक्ता थेटे | पदव्युत्तर विद्यार्थी (पास झालेले) | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७१६५ ९८२३७९२४०३ |
| ११. | श्रीम. स्नेहा दुबळे | मुख्य लिपिक, (रोख विभाग) | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७११४ |
| १२. | श्रीम. अरूणधती | लिपिक | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७११३ |
| १३. | श्रीम. एस.के. भगत | पाठयनिर्देशिक परिसेविका | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७५७७ |
| १४. | श्रीम. ज्योती भाटे | परिसेविका | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७३३१ ९८६९२८८८०९ |
| १५. | श्री. रमेश कदम | शस्त्रक्रियागार सहाय्यक | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७६९० |
| १६. | श्रीम. निर्मला जोगदिया | आयाबाई | बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय | २३०२७३२४ २३७५५९५५ |

प्रमुख कार्यालयाचा पत्ता -
टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय,
डॉ. ए.एल. नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.

**संस्थेच्या वेळा** महिन्यातूर एक वेळा व गरज असले तशी

**संस्थेमधील जनतेचा सहभाग** नाही.

**संस्थेचे इतिवृत्त तयार केले आहे का** होय

सही/-
डॉ. ए.एम. कान्हेरे

# भंगार माल विल्हेवाट समिती

बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयातील भंगार मालाची विल्हेवाट लावण्याचे अधिकार या रूग्णालयातील स्थानिक भंगार समिती कार्यरत आहे. सदर सन १९८२ पासून कार्यरत आहे व मुख्य उद्देश या रूग्णालयातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वस्तु व यंत्राची विल्हेवाट लावणे हे आहे.

विविध खात्यांतील विविध यंत्रसामुगी जसे वैद्यकीय उपकरणे, विद्युत व यांत्रिकी सामुग्री व इतर जडवस्तु, भंगार म्हणून विल्हेवाट लावताना संबंधित तांत्रिक अधिकारी जसे कार्यकारी अभियंता (वैद्यकीय ऋणकणिय कक्ष), कार्यकारी अभियंता (यां व वि), कार्यकारी अभियंता (यांत्रिकी दक्षिण) व कार्यकारी अभियंता (परिवाहन) आणि कार्यकारी अभियंता यांत्रिकी (प्रशितन) यांनी सदर वस्तूंचे भंगार म्हणून प्रमाणपत्र दिल्यानंतरच व ले.अ. सह. पडताळणी विभाग यांच्या पडताळणी नंतर उप अधिष्ठाता (२) हयांच्या अध्यक्षतेखाली सदर वस्तूंच्या मूल्यांकन ठरवीण्यासाठी सभा घेतली जाते. सभेमध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतात (पृष्ठ क्र. ९ वर दर्शविले आहे)

| | |
|---|---|
| १. उपअधिष्ठाता | - अध्यक्ष |
| २. सह प्रमुख कर्मचारी अधिकारी | - चिटणीस |
| ३. प्रशासकीय अधिकारी | - सदस्य |
| ४. सहाय्यक अधिष्ठाता | - सदस्य |
| ५. लेखा अधिकारी (नायर रूग्णालय) | - सदस्य |
| ६. सहाय्यक अभियंता (रूग्णालय) | - सदस्य |
| ७. लेखा अधिकारी (संग्रह पडताळणी विभाग) जी/उत्तर कार्यालय | - सदस्य |
| ८. कार्यकारी अभियंता (वै. ऋ. कक्ष)/(यां व वि)/परिरक्षण/प्रशितन | - सदस्य |

सदर मुख्य अधिकारी म्हणून या रूग्णालयाचे उप अधिष्ठाता (दोन) नायर रूग्णालय म्हणून आहेत.

या रूग्णालयाचे मुख कार्यालय 'नायर रूग्णालय' आहे व बैठकीचे इतिवृत्त लिखित स्वरूपात बनविले जाते. या बैठकीत स्थानिक भंगार समितीच्या व्यतिरिक्त बाहेरील कोणीही व्यक्ती भाग घेऊ शकत नाही. इतिवृत्त लिखित स्वरूपात बनविल्यानंतर अध्यक्षांसह इतर सदस्यांच्या स्वाक्ष-या घेतल्या जातात. सदर बैठकीचे इतिवृत्त बाहेरील जनतेसाठी दिले जात नाही. फक्त नायर रूग्णालयातील भंगार वस्तू झालेल्या विभाग प्रमुखांच्या माहितीकरीता प्रत पाठविली जाते. मान्यताप्राप्त भंगार कंत्राटव्दाराकडून दरपत्रिका मागविल्या जातात. सदरबाबींचे लेखा अधिकारी नायर यांचेकडून लेखा परिक्षण केल्या नंतर प्रस्तावर भंगार माल विल्हेवाट समिती पुढे ठेवला जातो. भंगार माल विल्हेवाट समितीने शेवटी घेतलेल्या निर्णया नुसार सक्षम अधिका-यांच्या मंजूरी अन्वये मालाची विल्हेवाट लावली जाते.

महानगरपालिकेच्या परिपत्रक क्र. सीए/एफएसव्ही/७४ दि. ०५.०६.१९८७ अन्वये भंगार मालाची विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेनुसार कार्यवाही केली जाते. तसेच अलिकडील मनपाचे परिपत्रक क्र. सीए/एफएसव्ही/२९ दि. २१.०३.२००५ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

सही/-
सहाय्यक अभियंता (यां व वि)